# न्यूज एक्सप्रेस मराठी

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » सोमवार, दि. 23 सप्टेंबर 2024 | पान- 1


# पिंपरी-चिंचवडमधील पिंपरी विधानसभेवर 'मशाल' चा दावा

## ठाकरे गटाचे शहराध्यक्ष सचिन भोसले यांची आक्रमक भूमिका: महाविकास आघाडीतील जागेसाठी पक्षश्रेष्ठींकडे आग्रह

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहरातील शिवसेना पक्षाचे शहर प्रमुख सचिन भोसले पिंपरी विधानसभा निवडणूक लढविण्यास तीव्र इच्छुक आहेत. आपण शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्याकडे तशी मागणी केली असल्याचेही त्यांनी पत्रकारांशी संवाद साधताना सांगितले.



तसेच पिंपरी चिंचवड शहरातील चिंचवड पिंपरी व भोसरी विधानसभा मतदारसंघांपैकी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला पिंपरी विधानसभा मतदारसंघ सुटण्याची चिन्हे आहेत. तशी आम्ही मागणी करत आहोत. असेही ॲड. सचिन भोसले यांनी सांगितले.

पिंपरी विधानसभा मतदारसंघात इच्छुकांची गर्दी मोठ्या प्रमाणात आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब पक्षाच्या वाट्याला पिंपरी विधानसभा मतदारसंघ येणार आहे. याकरिता अनेक पिंपरी विधानसभा मतदारसंघातील नेते शिवसेना पक्षातून उमेदवारी मिळविण्यासाठी प्रयत्न करत आहेत. परंतु, पक्षाच्या बाहेरील नेत्यांना शिवसेना पक्षातून उमेदवारी न देता आपल्या पक्षातीलच निष्ठावंतांचा विचार केला जाणार आहे. असे उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या सोबत झालेल्या पक्षाच्या बैठकीत ठरले, असल्याचेही एडवोकेट सचिन भोसले यांनी सांगितले.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे माजी आमदार ॲड. गौतम चाबुकस्वार हेही निवडणूक लढविण्याची तयारी करत आहेत. याविषयी सचिन भोसले यांना विचारले असता, उमेदवारीसाठी आम्ही दोघे इच्छुक आहोत परंतु, पक्षाचा निर्णय अंतिम राहील, असेही सचिन भोसले यांनी सांगितले.

ॲड. सचिन भोसले पिंपरी विधानसभा मतदारसंघ लढविण्यास इच्छुक आहेत. त्यांनी आपली तशी तयारी सुरू केली आहे, पिंपरी विधानसभा मतदारसंघात मोठ्या प्रमाणात रक्तदान शिबिर, आरोग्य शिबिर त्यांच्या वतीने घेण्यात येत आहेत. पिंपरी विधानसभा मतदारसंघ शिवसेना पक्ष लढविणार आणि जिंकणार असा त्यांनी ठाम आत्मविश्वास यावेळी दर्शविला आहे.

# पिंपरीसह चिंचवड आणि भोसरी विधानसभेवर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचा दावा

## बहुमताने ठराव मंजूर करत अजितदादांकडे केली मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी, चिंचवड व भोसरी विधानसभेवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजितदादा पवार गटाचा दावा केला आहे. याबाबत मध्यवर्ती कार्यालयात बहुमताने ठराव पारित केला असून, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे मागणी केली आहे.



पिंपरी चिंचवड शहर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या मासिक बैठकीमध्ये रविवार दिनांक २२ सप्टेंबर २०२४ रोजी आमदार अण्णासाहेब बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली शहर कार्यकारिणीची मासिक बैठक मध्यवर्ती पक्ष कार्यालय, खराळवाडी पिंपरी येथे आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीमध्ये आगामी विधानसभा निवडणुकीसाठी शहरातील तीनही मतदार संघ येतात त्यापैकी पिंपरी विधानसभा हा राष्ट्रवादीच्या कोट्यातील अधिकृत उमेदवार संघ आहे तो पक्षाच्या वतीने महायुतीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच लढणार आहे. त्या व्यतिरिक्त भोसरी व चिंचवड विधानसभेमध्ये देखील राष्ट्रवादी पक्षाची फार मोठी ताकद आहे. त्यामुळे दोन्ही मतदारसंघ चिंचवड व भोसरी विधानसभा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला मिळाव्या असा ठराव पक्षाच्या मासिक सभेमध्ये शहर कार्याध्यक्ष फजल शेख यांनी मांडला त्या ठरावाला महिला अध्यक्षा कविता आल्हाट यांनी अनुमोदन दिले आहे.

यावेळी आमदार अण्णा बनसोडे, जेष्ठ नेते भाऊसाहेब भोईर, माजी महापौर मंगला कदम, शहर कार्याध्यक्ष फजल शेख, महिला अध्यक्षा प्रा.कविता आल्हाट, युवक अध्यक्ष शेखर काटे, विद्यार्थी अध्यक्ष चेतन दुधाळ, ओबीसी अध्यक्ष विजय लोखंडे, माजी नगरसेवक सतीश दरेकर, संतोष बारणे, राजेंद्र जगताप, ज्ञानेश्वर कांबळे, गोरक्षनाथ पाषाणकर, निलेश पांढारकर, बन्सी पारडे, वरिष्ठ महिला कार्याध्यक्ष कविता खराडे, सामाजिक न्याय विभाग अध्यक्ष संजय औसरमल, सेवादल अध्यक्ष महेश झपके, सचिन औटे, सहकार सेल अध्यक्ष श्रीधर वाल्हेकर, असंघटीत कामगार सेल अध्यक्ष रविंद्र ओव्हाळ, उद्योग व व्यापार सेल अध्यक्ष श्रीकांत कदम, आदिवासी सेल अध्यक्ष विष्णू शेळके, युवक पिंपरी विधानसभा अध्यक्ष अक्षय माछरे, वाहतूक सेल अध्यक्ष विनोद वरखडे, व्हीजेएनटी अध्यक्ष राजू लोखंडे, लिगल सेल अध्यक्ष संजय दातीर, ग्राहक कल्याण सेल अध्यक्षा पल्लवी पांढरे, लता ओव्हाळ, महिला कार्याध्यक्ष उज्वला ढोरे, चिंचवड विधानसभा महिला अध्यक्षा संगीता कोकणे, मिरा कदम, उपाध्यक्ष विजय दळवी, तुकाराम बजबळकर, अरूण पवार, गोरोबा गुजर, रविंद्र सोनवणे, हर्षल मोरे, बाळासाहेब पिल्लेवार, राजीव क्षीरसागर, राजेंद्रसिंग वालिया, सरचिटणीस राजू चांदणे, अविनाश शेरेकर, स्वराज शिंदे, महेश माने, कुमार कांबळे, विजया काटे, यश बोध, रामकिसन माने, मिरा कांबळे, विनय शिंदे, जयश्री लांडगे, रमेश कांबळे, आशिष कांबळे, विक्रम पवार, रशिद सय्यद, ॲड शंकर पल्ले, विजय पांढारकर, दिलीप सरवदे, निलम कदम, देवी थोरात, सचिन वाल्हेकर, क्षमा सय्यद, सुजाता पांडे, राकेश गुरव, महेश ताकवणे, करण वाघ, सुनिल आडागळे, कार्यालयीन संपर्क प्रमुख धनाजी तांबे इत्यादींसह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.




# राज्यातील गोशाळांना सरसकट अनुदान, गोवंश संवर्धनासाठी शेतकऱ्यांना निधी!

## राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गोरक्षकांना दिला आश्वासन : डॉ. मिलिंद एकबोटे यांचे उपोषण स्थगित, आमदार महेश लांडगे यांची शिष्टाई

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यातील महायुती सरकारच्या माध्यमातून धोरणात्मक निर्णय घेऊन गोशाळांना अनुदान देण्यात येईल. तसेच, शेतकऱ्यांना गोवंश संवर्धनासाठी निधी देण्यात येईल, असे आश्वासन राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे.

श्रीक्षेत्र आळंदी येथे इंद्रायणी घाटावर प्रखर हिंदूत्ववादी नेते तथा गोरक्षक डॉ. मिलिंद एकबोटे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी देशी गोवंश संरक्षणासाठी देशी गोवंश बचाव जनआंदोलन व उपोषण सुरू केले होते. या उपोषणाला भाजपा आमदार महेश लांडगे यांनी भेट दिली. यावेळी आमदार लांडगे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी याबाबत मोबाइलद्वारे संपर्क साधला.




यावेळी तो प्रश्न मार्गी लावू असे आश्वासन उपुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले आहे.

राज्य सरकार, केंद्र सरकारकडे गोवंश संरक्षणासाठी एकत्रितपणे पाठपुरावा करू, अशी विनंती आमदार महेश लांडगे यांनी डॉ. मिलिंद एकबोटे यांना केली. उपमख्यमंत्री यांनी दिलेल्या शब्दामुळे व कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव मिलिंद एकबोटे यांनी तिसऱ्या दिवशी उपोषण स्थगित केले आहे.

डॉ. मिलिंद एकबोटे म्हणाले की, देशी गोवंश संरक्षणासाठी निर्णय होईल असा 'शब्द' मला देण्यात आला आहे. महेशदादांच्या शब्दावर विश्वास ठेवतो. आठ दिवसांत तशी हालचाल व निर्णयात्मक प्रक्रिया सुरू झाली नाही, तर पुन्हा येथे उपोषणास बसणार आहे. देशी गोवंश पाळणारे जे लोक आहेत, शेतकरी आहेत व शेतकऱ्यांबरोबर जे अन्य लोक आहेत त्यांचे प्रश्न महत्वाचे आहेत कारण आपल्या गोवंशाची काळजी आपणच घेऊ शकतो आणि त्याबाबतीत सरकारकडून सहकार्य व सवलती मिळणे अपेक्षित आहे.

> “ राज्यात खिल्लार गाई व खिल्लार बैल आहेत. हे सोन आपल्याकडे आहे. त्या सोन्याची जपणूक करणे संभाळ करणे सोन वाढवण्याचा प्रयत्न करणे. यासाठी आपण एकत्र आलो आहोत. माननीय उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी मला सांगितले की, “महेश लांडगे यांच्या समक्ष ज्या गोशाळा आहेत. त्या सर्व गोशाळांना सरसकट व गोवंशाला अनुदान देण्याचा संबंधित निर्णय घेऊ.” त्यामुळे आम्ही उपोषण स्थगित करीत आहोत. मात्र, प्रश्न मार्गी न लागल्यास पुन्हा आंदोलन करणार आहे.
>
> **- डॉ. मिलिंद एकबोटे, गोरक्षक.**

> “ राज्यातील शेतकऱ्यांकडे देशी गोवंश आहे त्यांना अनुदान देण्याचा विचार झाला पाहिजे. नैसर्गिक संकटांमुळे शेतकरी चिंतेत असतात. गाई व बैल सांभाळ करण्यासाठी त्यांना कसरत करावी लागते. त्यांना सहकार्य मिळणे सर्वात महत्वाचे आहे. निवडणूक आचारसंहितेपूर्वी तुमचा निर्णय करतो. त्याबाबत तांत्रिक बाबींचा विचार करण्यात येईल, असे आश्वासन उपमुख्यमंत्र्यांनी दिले आहे.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

---

# खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रयत्नांना यश

## पीएमआरडीएकडून मावळातील रस्त्यांसाठी 123 कोटींचा निधी

**पुणे | प्रतिनिधी**

मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीरंग बारणे यांच्या माध्यमातून आयटी नगरी हिंजवडी व तसेच मावळातील श्रीक्षेत्र देहू परिसरात एकूण तीन रस्त्यांच्या कामांसाठी सुमारे 123 कोटी रुपयांचा निधी मिळाला आहे. पीएमआरडीएच्या माध्यमातून या रस्त्यांची कामे केली जाणार आहेत.

श्रीक्षेत्र देहू येथे मोठ्या प्रमाणात भाविकांची ये-जा सुरू असते. देहूगाव ते येलवाडी ते तळेगाव-चाकण रस्ता या मार्गाची दुरवस्था झाल्याने या रस्त्याचे काम प्राधान्याने करण्याबाबत नागरिकांकडून खासदार बारणे यांना विनंती करण्यात आली होती. हिंजवडीमध्ये देखील रस्त्यांची दुरवस्था व वाहतूक कोंडीने वाहन चालक हैराण झाले आहेत. या पार्श्वभूमीवर तेथील दोन



रस्त्यांची कामे प्राधान्याने करण्याची सूचना खासदार बारणे यांनी केली. मेट्रोचे काम सुरू असलेल्या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याची सूचनाही बारणे यांनी केली.

खासदार श्रीरंग बारणे यांनी पीएमआरडीएच्या आयुक्तांसोबत बैठक घेतली. या बैठकीत पीएमआरडीएच्या माध्यमातून विविध रस्त्यांच्या कामाला निधी मिळाल्याचे सांगण्यात आले.

श्रीक्षेत्र देहूगाव ते येलवाडी ते तळेगाव मुख्य रस्त्याच्या कामासाठी 120 कोटी रुपये निधी मिळाला आहे. आयटी नगरी हिंजवडी मधील साखरे वस्ती रस्ता (ओलीव्ह सोसायटी) या कामासाठी 42 लाख रुपयांचा निधी मिळाला आहे. हिंजवडी फेज दोन मधील विप्रो सर्कल ते मारुंजी रस्त्यासाठी अडीच कोटी रुपये निधी मिळाला आहे.

वरील रस्त्यांपैकी हिंजवडी साखरे वस्ती ओलिव सोसायटी रस्ता पूर्ण झाला आहे. मारुंजी रस्त्याचे काम सुरू आहे. देहू येलवाडी रस्ता निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे. या रस्त्याचे काम लवकर सुरू होणार असल्याचे बैठकीत सांगण्यात आले.

---

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या गड किल्ल्यांशी आपले भावनिक नाते : डॉ. सुहास दिवसे

## जनजागृतीसाठी जिल्हाधिकारी कार्यालय प्रशासन व पुरातत्व विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'रन फॉर फोर्ट' मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

**पुणे | प्रतिनिधी**

साडेतीनशे वर्षानंतरही सर्वांना ऊर्जा देणारे छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांच्या गड किल्ल्यांशी आपले भावनिक नाते जोडले गेले आहे. ही ऊर्जा युनेस्कोलाही भावली आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी केले.




छत्रपती शिवाजी महाराजांचे 'मराठा लष्करी भूप्रदेश'अंतर्गत जागतिक वारसा स्थळाच्या यादीत नामांकनासाठी प्रस्तावित जिल्ह्यातील शिवनेरी, लोहगड आणि राजगड किल्ल्यांच्या नामांकनाच्या अनुषंगाने जनजागृतीसाठी जिल्हाधिकारी कार्यालय प्रशासन व पुरातत्व विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'रन फॉर फोर्ट' मॅरेथॉन स्पर्धेचे सकाळी ६ वाजता फर्ग्युसन महाविद्यालय येथे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेचा शुभारंभ आमदार सिद्धार्थ शिरोळे आणि जिल्हाधिकारी डॉ. दिवसे यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी डॉ. दिवसे बोलत होते.

यावेळी जिल्हा नियोजन अधिकारी किरण इंदलकर, जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे, पुरातत्व विभागाचे सहायक संचालक डॉ. विलास वाहणे, सहायक नियोजन अधिकारी गणेश दाणी, दिनेश काळे आदी उपस्थित होते.

डॉ. दिवसे म्हणाले, जगात अनेक किल्ले आहेत, अनेक राजे होऊन गेले. पण छत्रपती शिवाजी महाराज हे जागतिक कीर्तीचे राजे आहेत. छत्रपती शिवाजी महाराज यांचा जाज्वल्य इतिहास, स्फूर्ती आणि प्रेरणा प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिगत, सामाजिक आणि सांस्कृतिक भावनेत डोकावते आहे. युनेस्कोने भारतातील १२ किल्ले वारसा नामांकनासाठी निवडले आहेत. त्यापैकी राज्यातील ११ किल्ले असून पुणे जिल्ह्यातील शिवनेरी, लोहगड आणि राजगड हे तीन किल्ले आहेत. हे सर्व गड किल्ले आपणास वारसा नामांकनात आणायचे आहेत.

छत्रपती शिवाजी महाराज यांची ओळख जगाला व्हावी, म्हणून हा खटाटोप सुरू आहे. किल्ल्यांचे महत्त्व काय आहे. आपण गड किल्ल्यांचे संवर्धन कसे करत आहोत आणि सांस्कृतिक वारसा कसा जपत आहोत, याची माहिती युनेस्कोसमोर प्रदर्शित करायची आहे. जागतिक वारसा स्थळाच्या यादीत नामांकनासाठी प्रस्तावित किल्ल्यांबाबत जनजागृतीच्या अनुषंगाने जिल्ह्यात विविध उपक्रम आयोजित करण्यात येत आहेत. जिल्ह्यातील तीनही किल्ल्यांची जीएसआय कोड द्वारे मॅपिंग स्टोरी तयार केली आहे.

यूनेस्कोची समिती २७ ते ३० सप्टेंबर या कालावधीत शिवनेरी, लोहगड आणि राजगड किल्ल्यांना भेटी देणार आहेत. या पार्श्वभूमीवर सर्व तयारी करण्यात आली आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

आमदार श्री. शिरोळे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांचे १२ गड किल्ले वारसा नामांकनासाठी निवडले आहेत याचा खूप आनंद वाटत आहे. जिल्ह्यातील तीन किल्ल्यांच्या संवर्धनासाठी आमदार निधीतून मदत करण्यात येत आहे, असेही त्यांनी सांगितले.

# हरित सेतू प्रकल्पाने जीवनमान उंचावणार

## प्राधिकरणातील 5 रस्त्यांचा प्रकल्पामध्ये समावेश : 133 कोटी 47 लाख रुपयांच्या खर्चाला आयुक्तांची मंजुरी

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेने अर्बन स्ट्रीटनंतर रस्ते विकासासाठी हरित सेतू ही संकल्पना राबवण्याचा निर्णय घेतला आहे. पहिल्या टप्प्यात निगडी प्राधिकरण परिसरात हा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्यासाठी तब्बल १३३ कोटी ४७ लाख रुपयांच्या खर्चास आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी मान्यता दिली. हे काम बी. जी. शिर्के कंपनीला देण्यात आले आहे.

शहरातील नागरिकांना आरोग्यदायी वातावरण उपलब्ध व्हावे तसेच पर्यावरणपूरक जीवनमान अधिक उंचावण्यासाठी हा उपक्रम पथदर्शी ठरणार आहे. तसेच पर्यावरणपूरक साधनांचा प्रभावी वापर करून शहरभर पसरलेल्या हरित क्षेत्रांना एकमेकांना जोडल्या शहराची पर्यावरणीय गुणवत्ता वाढून त्याचा लाभ शहरवासियांना व्हावा यासाठी हा प्रकल्प उपयुक्त ठरणार आहे.

पिंपरी-चिंचवडमधील वाढती रहदारी आणि शहरी विस्तारामुळे रस्त्यांचा विकास आराखडा तयार करून पादचारी, सायकलस्वार आणि सार्वजनिक वाहतूक वापरकर्त्यांसह सर्व नागरिकांच्या गरजा याद्वारे पूर्ण करण्यावर



महापालिकेने भर दिला आहे. आंतरराष्ट्रीय मानांकन यांच्या आधारे आधुनिक रस्त्यांचे जाळे तयार करण्यासाठी हरित सेतू प्रकल्पाची अंमलबजावणी शहरात करण्यात आली आहे. या प्रकल्पाला ब्लूमबर्ग फिलान्थ्रॉपीज आणि ग्लोबल डिझायनिंग सिटीज इनिशिएटिव्ह (जीडीसीआय) सारख्या जागतिक संस्थेचे सहकार्यही मिळाले आहे, जेणेकरून तज्ज्ञ मार्गदर्शक या प्रकल्पास जोडले गेले आहेत.

शहरातील प्राधिकरण भागातील ५ चौ.कि.मी क्षेत्राची या पायलट प्रोजेक्टसाठी निवड करण्यात आली असून त्यामध्ये आच्छादित पदपथ व सायकल ट्रॅक विकसित करण्याचे महापालिकेचे नियोजन आहे. अर्बन स्ट्रीट डेव्हलपमेंट अंतर्गत विकसित करण्यात येणाऱ्या या प्रकल्पाचे उद्दिष्ट नागरिकांसाठी आरोग्यपूर्ण, स्वच्छतापूर्ण आणि पर्यावरणपूरक परिसर तयार करणे हे आहे.

यामुळे खासगी मोटार वाहनावरील अवलंबित्व कमी होण्यास मदत मिळेल तसेच लहान मुले, दिव्यांग आणि वयोवृद्धांसाठी सुरक्षित वातावरण निर्माण होईल. दरम्यान, हरित सेतू प्रकल्पासाठी एकूण १६० कोटी २७ लाख ३५ हजार ७०३ रुपयांची निविदा काढण्यात आली होती.

या निविदा प्रक्रियेत मे. बी. जी. शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी प्रा. लि. यांनी १७.१ टक्के कमी दराची निविदा सादर केली. त्यानुसार प्राप्त दरानुसार १३२ कोटी ४३ लाख ५९ हजार ६०५ रुपये, रॉयल्टी चार्जेस ३४ लाख ९१ हजार ८६१, मटेरियल टेस्टिंग चार्जेस ६९ लाख २९ हजार ४५५ रुपये असा एकूण १३३ कोटी ४७ लाख ८० हजार ९२१ रुपये खर्च या कामावर करण्यात येणार आहे.

### हरित सेतू प्रकल्पामुळे नागरिकांना मिळणार सुविधा

- रस्ते पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देऊन विशेषत: लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी सुरक्षित वातावरण
- आधुनिक ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टममुळे अपघात कमी होण्यास मदत मिळेल आणि वाहतूक सुरळीत होण्यास मदत
- सायकल ट्रॅकमुळे मोटर वाहनावरील अवलंबत्व कमी होऊन ध्वनी व वायुप्रदूषण कमी होण्यास मदत
- नियोजित समांतर पार्किंगमुळे वाहनांसाठी अडथळा मुक्त रस्ता तयार होणार
- सार्वजनिक वाहतूकस्नेही प्रकल्पामध्ये सुस्थितीतील बस स्टॉप आणि पादचाऱ्यांसाठी समान पातळीच्या पदपथांचा समावेश
- पर्यावरणपूरक वातावरण, सार्वजनिक आरोग्य आणि पायाभूत सुविधा वाढवणार

### प्रकल्पासाठी 200 कोटींचे हरित कर्जरोखे

- **पिंपरी चिंचवड शहरातील हरित सेतू प्रकल्पाकरिता ग्रीन बॉन्ड म्हणजे हरित कर्जरोखे विक्रीतून सुमारे २०० कोटींची रक्कम उभारण्यात येणार असून ग्रीन बॉन्ड उभारण्याची कार्यवाही लेखा विभागामार्फत सुरू आहे.**

> पादचाऱ्यांसाठी, सायकलप्रेमी तसेच लहान शाळकरी मुलांसाठी आणि रहिवाशांसाठी सार्वजनिक परिसर हा स्वच्छ, सुंदर आणि उत्साहवर्धक बनवण्याच्या उद्देशाने आणि शहरातील नागरिकांमध्ये पायी चालणे, सायकल चालवणे आणि धावणे या दैनंदिन आरोग्यदायी सवयीचे महत्त्व रुजवण्यासाठी हरित सेतू हा उपक्रम राबवण्यात येत आहे. हा उपक्रम शहरातील नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी एक दिशादर्शक उपक्रम ठरेल याची मला खात्री आहे.
>
> **- शेखर सिंह, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

# विधानसभेसाठी निवडणूक अधिकाऱ्यांना प्रशिक्षण

## यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनीत तीन दिवसांचा उपक्रम

**पिंपरी | प्रतिनिधी**

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी विधानसभा मतदारसंघनिहाय आढावा घेण्यात येत आहे. शहरातील तिन्ही विधानसभेच्या येत्या निवडणुकीसाठी निवडणूक आयोगाने विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम राबविला आहे. त्या अंतर्गत पिंपरी, चिंचवड व भोसरी विधानसभा मतदारसंघात मतदार नोंदणी मोहीम राबविण्यात आली. त्यांची प्रारूप मतदार यादी जिल्हाधिकारी कार्यालयाने प्रसिद्ध केली आहे. त्यानुसार शहरात १५ लाख ६३ हजार ६४७ मतदार संख्या झाली आहे.



आगामी विधानसभा निवडणुकीसाठी विधानसभा मतदारसंघनिहाय नेमलेल्या निवडणूक निर्णय अधिकारी व साहाय्यक निवडणूक निर्णय अधिका-यांना पुण्यातील यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) येथे प्रशिक्षण देण्यात आले आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील पिंपरी, चिंचवड, भोसरी आणि मावळ विधानसभा मतदारसंघातील अधिकारी या प्रशिक्षणास उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य निवडणूक विभागाने हे प्रशिक्षण सत्र घेतले. पुणे आणि कोकण विभागातील विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना तेथे प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणाचा कालावधी तीन दिवसांचा होता. निवडणूक पूर्व तयारी, ईव्हीएमची चाचणी, प्रचार यंत्रणा, आचारसंहितेचे पालन, अधिकारी व कर्मचा-यांना प्रशिक्षण देणे, मतदार केंद्रांची तयारी, मतदानाच्या दिवशीचे कामकाज, स्ट्राँग रूम, मतमोजणी आदी निवडणुकीसंदर्भातील सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले आहे. अधिका-यांना उपस्थित केलेल्या शंकांचे निरसन करण्यात आले. दरम्यान, ऑक्टोबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्याची दाट शक्यता आहे. त्या दृष्टीने निवडणूक यंत्रणा कामाला लागली आहे.

# रक्षक चौकात होणार भुयारी मार्ग

## वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटणार : सांगवी-किवळे रस्त्यावरील वाहनांची वर्दळ कमी होणार

**पुणे | प्रतिनिधी**

सांगवी-किवळे रस्त्यावरील वाहनांची वर्दळ कमी करण्यासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने किवळे रस्त्यावर रक्षक चौक येथे २६.४० मीटर रुंदीच्या भुयारी मार्गाची बांधणी करण्यात येणार आहे. या प्रस्तावित भुयारी मार्गामुळे प्रवाशांना रहदारीसाठी सुलभता निर्माण होणार असून, यामुळे इंधन व वेळेची बचत होणार आहे.

सांगवी ते किवळे या रस्त्यावर ४५ व ३० मीटर रुंदीचा बीआरटी मार्ग विकसित करण्यात आला आहे. तसेच हा रस्ता पिंपरी- चिंचवड व पुणे या दोन्ही महापालिकांना जोडणारा तसेच मुंबईकडे जाणाऱ्या वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा रस्ता आहे. या रस्त्यावर वाकड, हिंजवडी, पुनावळे, रावेत, किवळे, ताथवडे या भागात होत असलेल्या विकासामुळे तसेच वाढत्या शहरीकरणामुळे वाहनांची वर्दळ वाढली आहे.

वाढत्या रहदारीमुळे येथील वाहनांच्या रांगा लागून चौकामध्ये वाहतूक कोंडी होत आहे. या वाहतूक कोंडीचा बीआरटी बससेवा, शालेय विद्यार्थी बसेस, रोज ये-जा करणारे चाकरमानी तसेच मालवाहतूक प्रवाशांना त्रास सहन करावा लागत आहे. या सर्व समस्यांचे निराकरण करण्यासाठी रक्षक चौक येथे महापालिकेच्या वतीने भुयारी मार्गाची बांधणी करण्यात येणार आहे. या प्रकल्पास नुकत्याच झालेल्या स्थायी समिती बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.



**प्रस्तावित भुयारी मार्गाची माहिती**

भुयारी मार्गाची रुंदी – २६.४० मीटर (१८X५.५० मीटर)

कामाची मुदत – १८ महिने

निविदा रक्कम – २२ कोटी ७७ लाख

निविदा स्वीकृती रक्कम – १८ कोटी ६५ लाख

भुयारी मार्गासाठी औंध बाजूस १२५ मीटर व जगताप डेअरीच्या बाजूस २४० मीटर लांबीचा रॅम्प विकसित करणार

**भुयारी मार्गामुळे होणारे फायदे**

सांगवी ते किवळे रस्त्यावरील रहदारी कमी होण्यास मिळणार मदत

रक्षक चौकातील वाहतूक कोंडी कमी होऊन प्रवाशांच्या इंधनाची तसेच वेळेची बचत

बीआरटी बससेवा, शालेय विद्यार्थी बसेस, रोज ये-जा करणारे चाकरमानी तसेच मालवाहतूक प्रवाशांना होणार फायदा

इंधनाच्या बचतीमुळे संभाव्य पर्यावरणाची हानी टळणार

रक्षक चौकातील प्रस्तावित भुयारी मार्गामुळे वाहतूक कोंडी कमी होणार असून पिंपरी- चिंचवड व पुणे या दोन्ही मार्गावर प्रवास करणाऱ्या प्रवाशांना याचा फायदा होणार आहे. तसेच यामुळे डांगे चौकाकडून पिंपळे निलखकडे आणि पुण्याकडून औंध मिलिटरी स्टेशनकडे जाणारी वाहतूक विना सिग्नल होणार असून वेळेची तसेच इंधनाची देखील बचत होणार आहे.

> रक्षक चौकातील प्रस्तावित भुयारी मार्गामुळे वाहतूक कोंडी कमी होणार असून पिंपरी-चिंचवड व पुणे या दोन्ही मार्गावर प्रवास करणाऱ्या प्रवाशांना याचा फायदा होणार आहे. तसेच यामुळे डांगे चौकाकडून पिंपळे निलखकडे आणि पुण्याकडून औंध मिलिटरी स्टेशनकडे जाणारी वाहतूक विना सिग्नल होणार असून वेळेची तसेच इंधनाची देखील बचत होणार आहे.
>
> **- प्रमोद ओंबासे, मुख्य अभियंता, महापालिका**

> सांगवी ते किवळे रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या संख्येमध्ये वाढ होत असल्याने, रक्षक चौकामध्ये वाहतूक कोंडीचा भार वाढत आहे. वाढणाऱ्या कोंडीवर धोरणात्मक उपाय म्हणून भुयारी मार्ग विकसित करण्यात येणार आहे. भुयारी मार्गाची उभारणी केल्यानंतर या मार्गावरील वाहतूक कोंडी कमी करून मार्गावरून प्रवास करणाऱ्या रहिवाशांसाठी सुव्यवस्था निर्माण होणार आहे आणि वाहतुकीस लागणारा कालावधी तसेच इंधनाच्या बचतीमुळे संभाव्य पर्यावरणाची हानी टाळता येणार आहे.
>
> **- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, महानगरपालिका**

# टोमॅटो, फ्लॉवर, शेवगा, मटारच्या दरात वाढ

## मागणी वाढल्याने टोमॅटो, फ्लॉवर, शेवगा, मटार, गाजर, ढोबळी मिरचीच्या दरात वाढ

**पुणे | प्रतिनिधी**

मागणी वाढल्याने टोमॅटो, फ्लॉवर, शेवगा, मटार, गाजर, ढोबळी मिरचीच्या दरात वाढ झाली. अन्य फळभाज्यांचे दर स्थिर असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली. श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील घाऊक बाजारात रविवारी (२२ सप्टेंबर) राज्य, तसेच परराज्यातून मिळून ९० ते १०० ट्रक फळभाज्यांची आवक झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत फळभाज्यांची आवक किंचित वाढली.

पितृपंधरवड्यामुळे फळभाज्यांच्या मागणीत वाढ झाली आहे. कर्नाटक, गुजरात, आंध्र प्रदेशातून मिळून ७ ते ८ टेम्पो हिरवी मिरची, कर्नाटक, गुजरातमधून मिळून प्रत्येकी ५ ते ६ टेम्पो कोबी, कर्नाटकातून २ ते ३ टेम्पो पावटा, कर्नाटक आणि गुजरातमधून ४ ते ५ टेम्पो घेवडा, आंध्र प्रदेश, तमिळनाडूतून मिळून २ ते ३ टेम्पो शेवगा, मध्य प्रदेशातील इंदूर भागातून ५ ते ६ टेम्पो गाजर, कर्नाटक, गुजरातमधून ४ टेम्पो भुईमूग शेंग, मध्य प्रदेशातून ७ ते ८ टेम्पो लसूण अशी आवक परराज्यातून झाली, अशी माहिती मार्केट यार्डातील ज्येष्ठ अडते विलास भुजबळ यांनी दिली.

पुणे विभागातून सातारी आले ४०० ते ५०० गोणी, भेंडी ७ ते ८ टेम्पो, गवार ५ ते ६ टेम्पो, टोमॅटो ७ ते ८ हजार पेटी, हिरवी मिरची ३ ते ४ टेम्पो, ढोबळी मिरची ७ ते ८ टेम्पो, पुरंदर, पारनेर, वाई, सातारा परिसरातून मटार १०० गोणी, काकडी ७ ते ८ टेम्पो, कोबी ४ ते ५ टेम्पो, फ्लॉवर ७ ते ८ टेम्पो, तांबडा भोपळा १० ते १२ टेम्पो, कांदा ७० ते ८० ट्रक, तसेच इंदूर, आग्रा, स्थानिक भागातून ४० टेम्पो बटाट्याची आवक झाली.



**कोथिंबिरेसह पालेभाज्यांच्या दरात घट**

महिनाभरापासून कोथिंबिर, मेथीसह सर्व पालेभाज्यांचे दर तेजीत होते. कोथिंबिर, मेथीची आवक वाढल्याने दरात घट झाली. शेपू, कांदापात, करडई, पुदिना, राजगिरा, चुका, चवळईचे दर स्थिर आहेत. मार्केट यार्डातील तरकारी विभागात कोथिंबिर दीड लाख जुडी, तसेच मेथीच्या ४० हजार जुडींची आवक झाली. गेल्या आठवड्यात किरकोळ बाजारात कोथिंबिरेच्या एका जुडीचे दर ५० ते ७० रुपये होते. मेथीच्या एका जुडीचे दर ४० ते ५० रुपये होते.

**पालेभाज्यांचे शेकड्याचे दर पुढीलप्रमाणे –**

» कोथिंबीर- १००० ते २०००, मेथी – १५०० ते २०००, शेपू – ८०० ते १५००, कांदापात- १२०० ते २०००, चाकवत – ५०० ते ८००, करडई- ५०० ते ८००, पुदिना – ५०० ते १०००, अंबाडी – ५०० ते ७००, मुळे – ८०० ते १५००, राजगिरा- ४०० ते ८००, चुका – ६०० ते १०००, चवळई- ५००-८००, पालक- १२००-१५००.

**गणेशोत्सवानंतर फळांच्या मागणीत घट**

» गणेशोत्सवानंतर फळांच्या मागणीत घट झाली. सर्व फळांचे दर स्थिर असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली. फळबाजारात रविवारी केरळहून अननस ६ ट्रक, मोसंबी ६० ते ७० टन, संत्री ४० ते ५० टन, डाळिंब ५० ते ६० टन, पपई ८ ते १० टेम्पो, लिंबे एक हजार ते दीड हजार गोणी, कलिंगड ५ ते ६ टेम्पो, खरबूज २ ते ३ टेम्पो, चिकू एक हजार खोकी, पेरू ७०० ते ८०० प्लास्टिक जाळी (क्रेट), सीताफळ २० ते ३० टन अशी आवक झाली.